# M.A. (Part–I) Examination
# MARATHI
## Paper—II
## (Arwachin Kavita)

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 100

**सूचना :— सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.**

1. पुढील काव्यपंक्तीचा संदर्भासह अर्थ स्पष्ट करा :

(अ) सारे स्त्रीपुरुष भावंडांत लेखी।। मांगम्हारा दु:खी।। करीताती।।१।।
खिस्तमहंमदा सत्यानें आळवी।। मानवा वळवी।। ईशाकडे।।२।।
धर्म-देश-जाती-भेद नाहीं तिला।। शोभे मनुजाला।। खरी माता।।३।।
अशा मानवील सतत्री म्हणावी।। तिची कीर्ती गावी।। जोती म्हणे।।४।।

किंवा

हे महान गवश्या !
हे युद्ध एकात्मिक पातळीवर जिकून
समूहांना गारद करून
कसा चाललास पुढं
या शतकात-सहस्त्रकात ?
ह्या मध्ययुगीन आवरासावरीकडं
कोण पाहील ?

(ब) हे लाडके ! आणिक लाडक्यानो !
दावू तुम्हां तोंड कसे फिरोन ?
जन्मास मी काय म्हणोनि आलो ?
येताच वा का न मरोनि गेलो ?

किंवा

निसर्गनियमांचे। आकलन करी
स्वतंत्रता पुरी। माणसाची
माणसामधील। स्वातंत्र्याची ईर्षा
विकासाची दिशा। ठरवीते.

(क) गातां धर्माचे पवाडे। उघडी झालेली कवाडें
दाविती अब्रुचीं की हाडें। टांगलेली।।
अरे हिंदू-मुसलमान। प्राण देशावरी कुर्बान;
परी यादवी ही लांछन। अल्ला-रामां।।

किंवा

केव्हा टाकेल माझे आयुष्य
अंधाराची कात
अरे अशी कशी रे
बहिष्कृत केली, तुम्ही
या देशातील कास्तकाराची जात.

(ड) म्होरं लिहा –

मनीआडर उशिरानी का व्हयना,
घर जाती,
म्हनावं-नवी वजरटीक घडवलीय
वाक्या पाटिवल्यात इष्णुकड
आन् घा कमी पन्नास रूपयंबी
त्येचं पोगीला याक पुस्तक घ्या

किंवा

विश्वासातल्या टोळ्यांहो
करा टोळधाडींचा धिक्कार
का होता नाऊमेद
निर्माण करा की मूळ टोळ्या
जगण्यातलं संगीत निजगभली नाद
पसरा सर्वदूर

2. 'अखंडादी' काव्यामधील म. फुले यांचा नैतिक मूल्यांचा विचार उदाहरणांसह स्पष्ट करा.

किंवा

'अभुजमाड' मधील आदिवासींच्या निसर्गजाणिवांचे उदाहरणांसह विवेचन करा.

3. केशवसुतांच्या कवितेतील सामाजिकता विशद करा.

किंवा

'जागतिकीकरणातील मराठी कविता' या संग्रहातील माणसातील माणुसकी हरवत चालल्याची भावना स्पष्ट करा.

4. मर्ढेकर नवकवितेचे जनक आहेत, सोदाहरण स्पष्ट करा.

किंवा

'आयुष्य नांगरताना' मधील शेतकऱ्यांचा विद्रोह स्पष्ट करा.

5. कवी नारायण सुर्वे यांची कविता सामाजिक क्रांतीच्या संकल्पनेशी बांधिलकी मानणारी आहे हे स्पष्ट करा.

किंवा

कोणत्याही दोहोंवर टिपा लिहा :—

(1) केशवसुतांचा आधुनिकतावाद

(2) अभुजमाडमधील आदिवासी संस्कृती

(3) 'नंतर आलेले लोक' मधील उपरेपणा

(4) चार्वाकांचे तत्वज्ञान

(5) देकार्तचा ईश्वर आणि बुद्धी यांतील भेद